विषय - कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून
अधिकारी व कर्मचारी यांची कार्यालयीन उपस्थिती
३३ टक्के पर्यंत मर्यादित ठेवण्याबाबत...

सातारा जिल्हा परिषद, सातारा
जा.क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/कावि/१८२/२०२०
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक- १८ मे, २०२०.

परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, "कोरोना-१९" विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या दिनांक १८ मे, २०२० ते दिनांक ३१ मे, २०२० अखेर लॉकडाऊनच्या कालावधीमधील अधिकारी/कर्मचारी यांची कार्यालयीन उपस्थिती मर्यादित ठेवण्याबाबत दिनांक १७ मे,२०२० रोजीच्या आदेशानुसार सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच शासनाने दि. २ मे २०२० व दि. ४ मे २०२० रोजीच्या आदेशामध्ये दिलेले निर्देश " जैसे थे " लागु राहतील.

महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १७ मे २०२० च्या आदेशानुसार सातारा जिल्हा परिषद मुख्यालयामधील सर्व विभाग, सर्व पंचायत समित्या आणि सर्व क्षेत्रीय कार्यालयामधील अधिकारी/ कर्मचारी यांची दैनंदिन उपस्थिती दिनांक ०४ मे २०२० ते दिनांक ३१ मे २०२० अखेर लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये ३३ टक्के इतकी ठेवण्यात यावी.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी/ कर्मचारी यांची रोटेशन पध्दतीने कार्यालयीन उपस्थिती निश्चित करण्याबाबतची उपाययोजना करावी. उर्वरीत कर्मचा-यांनी घरुन काम करण्याबाबत नियोजन करावे. सर्व दैनंदिन प्रलंबित संदर्भ तसेच लेखा परिक्षणातील मुद्दे निर्गत करण्यावर भर देण्यात यावा. त्याचप्रमाणे अत्यावश्यक सेवेच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख व कर्मचारी यांनी आपले मोबाईल चालू स्थितीत ठेवणे बंधनकारक आहे. तसेच कार्यालयीन कामकाजाच्या अत्यावश्यक सेवेसाठी मोबाईलवर संपर्क साधला असता वरिष्ठांच्या सूचनेनुसार आवश्यकतेनुसार कार्यालयामध्ये उपस्थित रहावे.

याबाबतचे रोटेशननुसार कर्मचारी उपस्थितीबाबत कार्यालयीन आदेश आपण आपल्या स्तरावरून संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना निर्गमित करण्यात यावेत.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा
मोबा. ९४२२९९३३३३
ceozpstr@gmail.com

प्रति,

१. सर्व खातेप्रमुख,
सातारा जिल्हा परिषद,सातारा .........